-: प्रेसनोट दिनांक - १२/११/२०२५ :-

आरोपी लोकसेवक ०१) इलाही मिरा मुल्ला, वय-७१ वर्षे, पद- (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) कंत्राटी कर्मचारी, भुसंपादन विभाग-६ कार्यालय, कोल्हापूर रा.२५१९/क्र.४, डी वॉर्ड, डांगे गल्ली, जूना बुधवारपेठ, कोल्हापूर, यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........

---

तक्रारदार यांचे वडील, आत्या व काका यांचे नावे रेंदाळ, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील गट नं.९८७ मध्ये समाईक शेत जमीन आहे. सदर गट नं.९८७ मधील ०.६० गुंठे क्षेत्र दुधगंगा कालव्यासाठी भुसंपादित केले आहे. भुसंपादित झालेल्या जमिनीचा मोबदला मिळणेच्या अनुषंगाने तक्रारदार यांचे वडील, काका व आत्या यांचे नांवे नोटीस आली होती. तकारदार यांचे वडील मयत असल्याने तक्रारदार यांनी त्यांचे जमिनीचा मोबदला रक्कम मिळणेकरीता दिनांक ०४/०९/२०२५ रोजी उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्रमांक-६ कार्यालय, कोल्हापूर येथे अर्ज केला होता. सदर अर्जाची चौकशी करण्याकरीता तक्रारदार हे दिनांक ०३/११/२०२५ रोजी उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्रमांक-६, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे गेले असता सदर कार्यालयातील क्लार्क इलाई मुल्ला यांना भेटले त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांचे भुसंपादित झालेल्या जमिनीचा मोबदला उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्रमांक-६, जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठांकडून काम करून देण्याकरीता १०,०००/-रू लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी लोकसेवक ईलाही मिरा मुल्ला यांनी तक्रारदार यांना त्यांचे रेंदाळ, ता.हातकणंगले येथील दुधगंगा कालव्यामध्ये भुसंपादित झालेल्या जमिनीचा मोबदला वरिष्ठांकडून मंजूर करून देण्याकरीता १०,०००/- रूपयांची लाच मागणी करून तडजोडी अंती ८,०००/- रूपयांची लाच मागणी करून स्विकारण्यास संमती दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक इलाही मिरा मुल्ला, वय-७१ वर्षे, पद- (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) कंत्राटी कर्मचारी, भुसंपादन विभाग-६ कार्यालय, कोल्हापूर यांनी ८,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक इलाही मिरा मुल्ला, वय-७१ वर्षे, पद- (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) कंत्राटी कर्मचारी, भुसंपादन विभाग-६ कार्यालय, कोल्हापूर रा.२५१९/क्र.४, डी वॉर्ड, डांगे गल्ली, जूना बुधवारपेठ, कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, सफौ प्रकाश भंडारे, पोहेकॉ/विकास माने, पो.हे.कॉ. संदीप काशीद, मपोहेकॉ/संगिता गावडे, पो.ना. सचिन पाटील, पोकॉ उदयसिंह पाटील, चालक सफौ गजानन कुराडे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७, ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. व ई-मेल आयडी- dyspacbkolapur@gamil.com